# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः27.01.2026** **वारःमंगळवार**

---

- भारत आणि युरोपियन यूनियन यांच्यातील व्यापार कराराची घोषणा आज होणार
- अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आज नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक
- गोव्यात आयोजित भारत ऊर्जा सप्ताहाचं आज पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून होणार उद्घाटन
- 77वा प्रजासत्ताक दिन सोहळा देशभरात उत्साहात साजरा
- आणि
- उत्तराखंडमध्ये समान नागरी संहिता कायदा तात्काळ प्रभावानं लागू

**<u>युरोपियनयुनियनमुक्तव्यापारकरार</u>**

भारत आणि युरोपियन परिषदे दरम्यानच्या प्रस्तावित मुक्त व्यापार कराराच्या अधिकृत वाटाघाटी पूर्ण झाल्याची माहिती काल वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिली आहे. या करारामुळे उभय देशातील द्विपक्षीय वाणिज्य व्यापार आणि आर्थिक संबंध दृढ होण्यास मदत मिळणार आहे. भारताच्या दृष्टीनं हा व्यापार करार संतुलित आणि भविष्यवेधी असल्याचे अग्रवाल यांनी म्हटलं आहे. तसेच, यामुळे दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थांदरम्यान व्यापार आणि गुंतवणुकीला चालना मिळणार आहे. युरोपियन यूनियन आणि भारत यांच्यात आज दिल्लीत होणाऱ्या १६व्या शिखर परिषदेत या कराराची घोषणा होणार आहे. युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला व्हॉन डेर लेयन आणि युरोपियन परिषदेचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा दिल्लीत शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत चर्चा करणार आहेत.

**<u>भारतईयुसंरक्षण</u>**

दरम्यान, युरोपियन यूनियन आणि भारत यांच्या दरम्यान सुरक्षा आणि संरक्षण भागीदारीवरही आज शिखर परिषदेत स्वाक्षऱ्या होणार असल्याचे युरोपियन आयोगाच्या उपाध्यक्ष काजा कलास यांनी म्हटलं आहे.

**<u>सर्वपक्षीयबैठक</u>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर आणि कामकाजावर चर्चा करण्यासाठी, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज सकाळी 11 वाजता सर्वपक्षीय बैठक

बोलावली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. प्रारंभी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दोन्ही सभागृहांच्या सदस्यांना संबोधित करतील.
१ फेब्रुवारीला 2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला जाईल. या अधिवेशनाचा पहिला टप्पा येत्या १३ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. तर दुसऱ्या टप्प्याचं कामकाज ९ मार्च ते २ एप्रिल या कलावधीत निश्चित करण्यात आलं आहे.

**प्रजासत्ताकसोहळा**

७७वा प्रजासत्ताक दिन सोहळा काल देशभरात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी दिल्लीतल्या कर्तव्य पथावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत दिमाखदार पथसंचलन झालं. मुख्य सोहळ्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अपर्ण करून शूरवीरांना आदरांजली वाहिली. मुख्य संचलनाला सुरुवात होण्यापूर्वी राष्ट्रपतींच्या हस्ते ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांना 'अशोक चक्र' प्रदान करून सन्मानित करण्यात आलं. प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याला, युरोपियन परिषदेचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला फॉन डेर लेयन यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. यंदाच्या पथसंचलनाची मध्यवर्ती संकल्पना स्वातंत्र्याचा मंत्र- वंदे मातरम् आणि समृद्धीचा मंत्र- आत्मनिर्भर भारत अशी होती. या दिमाखदार पथसंचलनात देशाच्या संरक्षण दलांचं सामर्थ्य आणि सांस्कृतिक विविधतेचं दर्शन झालं. विविध राज्य आणि केंद्र सरकाच्या मंत्रालयांचे ३० चित्ररथ या संचलनात सहभागी झाले होते. ऑपरेशन सिंदूरचं प्रारूप दाखवणारा लष्कराचा चित्ररथ, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचा ‘भारत गाथा - श्रुती, कृती, दृष्टी’ या संकल्पनेचा चित्ररथ, तसंच महाराष्ट्राच्या 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या विषयावरील चित्ररथानं उपस्थितांचं लक्ष वेधून घेतलं.

**जग-प्रजासत्ताक**

जगभरातील भारतीय समुदायानं परदेशातील भारतीय दूतावासांमध्ये भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन काल उत्साहात साजरा केला. सौदी अरेबियामध्ये, रियाधमधील भारतीय दूतावासात, नेपाळमध्ये, काठमांडूमधील भारतीय दूतावासातही प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. श्रीलंकेतील भारतीय उच्चायुक्तांनी त्यांच्या सर्व कार्यालयांमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा केला.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, ब्रिटनचे राजे चार्ल्स तिसरे आणि फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांनी भारताला प्रजासत्ताक दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

**आकाशवाणी-प्रजासत्ताकदिन**

आकाशवाणीच्या नवी दिल्ली इथल्या मुख्यालयात प्रजासत्ताक दिन काल उत्साहात साजरा झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'मन की बात' कार्यक्रम देशभरातील समाजाच्या प्रत्येक घटकातील लोकांच्या सकारात्मक योगदानाला ओळख देणारं आणि ते लोकांपर्यंत पोहोचवणारे एक व्यासपीठ म्हणून उदयास येत आहे,असं मत माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी व्यक्त केलं. या कार्यक्रमाला माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन,माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू,

प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. आकाशवाणीचे महासंचालक राजीव कुमार जैन यांनी आकाशवाणी भवनात राष्ट्रध्वज फडकवला.

**<u>राष्ट्रपतीभवन</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त काल राष्ट्रपती भवनात स्नेहभोजनाचं आयोजन केलं होतं. या कार्यक्रमाला  युरोपियन परिषदेचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा, युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला फॉन डेर लेयन,उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**<u>गोवाओएनजीसी</u>**

गोव्यात आजपासून बेतुल इथल्या ओएनजीसी प्रकल्पामध्ये आजपासून भारत  ऊर्जा सप्ताहच्या चौथ्या आवृत्तीचं आयोजन करण्यात आलं आहे. या महोत्सवाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरस्थ माध्यमातून करणार आहेत. जागतिक स्तरावर होत असलेल्या ऊर्जा बदलांमधील तिसरा सर्वांत मोठा ऊर्जा ग्राहक म्हणून भारत उदयाला येत आहे. त्या पार्श्वभूमीवर पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं आयोजित केलेल्या या महोत्सवात प्रमुख १२० देशांमधील ७५हजारांहून अधिक व्यावसायिक आणि ५५० वक्ते सहभागी होणार आहेत. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी तसंच संयुक्त अरब अमिरातीचे उद्योग आणि प्रगत तंत्रज्ञान मंत्री  डॉ.सुलतान अहमद अल जाबेर सहभागी होणार आहेत. यामध्ये हरित हायड्रोजनपासून जैव इंधनापर्यंतच्या नवकल्पना सादर केल्या जाणार आहेत.

**<u>उत्तराखंड-समाननागरीकायदा</u>**

उत्तराखंड सरकारनं राज्यपालांच्या मंजुरीनंतर, २०२४ च्या समान नागरी संहिता कायद्यात आवश्यक सुधारणा करण्यासाठी समान नागरी संहिता सुधारणा अध्यादेश, २०२६ लागू केला आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, भारतीय  संविधानाच्या २१३ कलमा अंतर्गत उत्तराखंडच्या राज्यपालांनी हा अध्यादेश जारी केला असून, तो तात्काळ प्रभावानं लागू झाला आहे. समान नागरी संहिता लागू करून उत्तराखंडनं इतर राज्यांसाठी मार्ग दाखवला आहे, असं उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी म्हणाले. महिला सक्षमीकरण, बालकांच्या हक्कांचं संरक्षण आणि नागरी हक्कांमध्ये समानता सुनिश्चित करण्यासोबतच, कार्यपद्धती सुलभ करणं हे समान नागरी संहितेचं सर्वात महत्त्वपूर्ण उद्दिष्ट आहे, असं ही ते म्हणाले.

**<u>महाराष्ट्रकवायत</u>**

महाराष्ट्रात राष्ट्र प्रथम; या उपक्रमांतर्गत प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने राज्यभरात शासकीय ध्वजावंदनानंतर शालेय विद्यार्थ्यांचं एकाच वेळी देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत संचलन झालं. या उपक्रमात राज्यातल्या एक लाख शाळांमधल्या दोन कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी एकाच वेळी देशभक्तीपर गीतावर

शिस्तबद्ध आणि समन्वयपूर्ण कवायत सादर केली. या उपक्रमाची अधिकृत नोंद लंडन इथल्या वर्ल्ड बूक ऑफ रेकॉर्डस् या आंतरराष्ट्रीय संस्थेने घेतली असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली.

**<u>एनएसडीभारतरंग</u>**

राष्ट्रीय नाट्य विद्यालय म्हणजेच नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा आयोजित जागतिक स्तरावरच्या सर्वात मोठ्या २५व्या भारत रंग महोत्सव या आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सवाला आजपासून सुरुवात होत आहे. हा महोत्सव वीस फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. या महोत्सवाच्या कार्यक्रमांचे देशभरातल्या ४० ठिकाणी आयोजन केले जाणार आहे. सातही खंडांतील प्रत्येक देशातील किमान एक सादरीकरण यामध्ये होणार आहे. महोत्सवात २७७ भारतीय कार्यक्रम तसेच १३६ निवडक नाटके सादर होतील. तसेच १२ आंततराष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमही सादर केले जातील. २२८ भारतीय आणि परदेशी भाषा, बोलीभाषा यांच्या सादरीकरणाचा यात समावेश असेल.

**<u>भारतपर्व-एनओए</u>**

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि केंद्रीय संस्कृती आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी काल नवी दिल्लीतील लाल किल्ल्यावर राष्ट्रीय संस्कृती आणि पर्यटन महोत्सव 'भारत पर्व २०२६' चं उद्घाटन केलं. हा महोत्सव भारताचा सांस्कृतिक वारसा सक्षम करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करेल, असं सांगत ओम बिर्ला यावेळी म्हणाले की, सहा दिवस चालणाऱ्या या महोत्सवाच्या माध्यमातून लोकांना विविध राज्यं आणि प्रदेशांची संस्कृती पाहता येईल.

**<u>भाजपअध्यक्ष-पश्चिमबंगाल</u>**

भाजपचे नवनियुक्त राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन आजपासून दोन दिवसांच्या पश्चिम बंगाल दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात ते आगामी राज्य विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची संघटनात्मक रचना मजबूत करण्याच्या उद्देशानं आयोजित केलेल्या बैठकांमध्ये सहभागी होतील.

**<u>क्रिकेट</u>**

19 वर्षाखालील मुलांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना झिंबाब्वे संघाशी होणार आहे. सुपर सिक्स गटातला हा सामना झिंबाब्वेच्या बुलावायो इथं खेळला जाईल. भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी एक वाजता सामना सुरू होईल. या स्पर्धेत भारत आतापर्यंत अजिंक्य राहिला आहे. या स्पर्धेत अमेरीका, बांग्लादेश आणि न्यूझिलंड विरुद्धचे सर्व सामने भारतीय संघानं जिंकले आहेत.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**